क्रमांक :- १६४९/ ग-२,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक :- १६ जानेवारी, २०२३.

**विषय :- विधान भवन, मुंबई येथे राबविण्यात येणाऱ्या सुरक्षा विषयक प्रकल्पाच्या अनुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची बायोमॅट्रीक यंत्रणेवरती तळहाताची (Palm) नोंद करण्याबाबत...**

**:: प रि प त्र क ::**

या सचिवालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, विधान भवन, मुंबई या इमारतीच्या सुरक्षीततेकरिता राबविण्यात येणारा सुरक्षा विषयक प्रकल्प कार्यान्वीत करण्यात येणार आहे.

सदरहू प्रकल्प कार्यान्वीत करण्याकरिता या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची बायोमॅट्रीक प्रणालीद्वारे तळहाताची (Palm) नोंद घेण्यात येणार आहे. याकरीता विधान भवन, मुंबई येथील एस.बी.आय. या गेट जवळील नव्याने उभारण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. नियंत्रण कक्ष (Control Room) येथे मंगळवार, दिनांक १७ जानेवारी, २०२३ ते शुक्रवार, दिनांक २० जानेवारी, २०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत स्वत:चा पासपोर्ट आकाराचा एक फोटो (छायाचित्र) सोबत घेऊन नोंदणी करण्याकरिता उपरोक्त कालावधीत उपस्थित रहावे.

**(रविंद्र जगदाळे)**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

३) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक



\\mlsg204\E\D Drive Rane\H\S.O\MIPL TENDER\Bill NOTE.docx

४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

५) जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) क-२ संगणक कक्ष.

११) निवडनस्ती.